वाशिम जिल्यातील माध्यमिक स्तरावरील अविरत प्रशिक्षणाच्या परिणामकारकतेचा अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ ,नांदेड यांना पी .एच.डी.(शिक्षणशास्त्र)

पदवीसाठी सादर करण्यात आलेला संशोधन आराखडा

संशोधक

शिवशंकर वामनराव मोरे

एम .ए .एम .एड्.सेट,नेट(शिक्षणशास) नेट (इतिहास)

अधिव्याख्याता
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था ,
वाशिम

मार्गदर्शक

डॉ.मधुकर अबाजी पुंडगे

एम .ए . एम . एड्. पी .एच.डी.(शिक्षणशास्त्र)

प्राचार्य

संत गाडगे महाराज अध्यापक महाविद्यालय ,हिंगोली

वर्ष -२०१९

संशोधन आराखडा

वाशिम जिल्यातील माध्यमिक स्तरावरील अविरत प्रशिक्षणाच्या परिणामकारकतेचा अभ्यास

१.१ प्रास्ताविक

मानवी जीवन सुखी व समृद्ध करण्यासाठी शिक्षणाशिवाय दुसरा पर्याय नाही. आजच्या शिक्षण पद्धतीमध्ये शिक्षण ही निरंतर चालणारी संकल्पना आहे. भारताचा शिक्षणाच्या दृष्टीने विचार केल्यास वैदिक काळामध्ये गुरुकुल पद्धती अस्तित्वात होती.पण आज मात्र औपचारिक शिक्षण पध्दतीआपल्याकडे दिसून येते . शिक्षकांना व्यावसायिक अर्हता म्हणून सेवापूर्व व सेवांतर्गत असे दोन प्रकारचे व्यावसायिक प्रशिक्षण आवश्यक आहे. सेवापूर्व प्रशिक्षण म्हणजे डी.एल.एड. (डिप्लोमा इन एलिमेंटरी एज्युकेशन- प्राथमिक शिक्षण पदविका) बी.एड. एम .एड्.इत्यादी व्यावसायिक अर्हतेचे प्रशिक्षण शिक्षकांना आवश्यक आहे. विविध प्रकारचे सेवांतर्गत प्रशिक्षण उदा. अल्पमुदत,दीर्घ मुदत प्रशिक्षणे, वरिष्ठ श्रेणी, निवड श्रेणी प्रशिक्षणे अभ्यासक्रमाविषयक प्रशिक्षण इत्यादींचा उल्लेख करता येईल.

शिक्षकांचे व्यवसायात आधुनिक काळात प्रशिक्षणाला फार महत्व प्राप्त झाले आहे. पूर्व प्राथमिक शिक्षक, प्राथमिक शिक्षक ,माध्यमिक शिक्षक, कार्यानुभव शिक्षक, तंत्र शिक्षक, चित्रकला व गायक शिक्षक व शारीरिक शिक्षणाचे शिक्षक असे अनेक प्रकारचे शिक्षक शाळेला लागतात. या सर्वांचे प्रशिक्षण होणे आवश्यक असते. महाविद्यालयीन प्राध्यापकांनाही प्रशिक्षण देण्याची कल्पना पुढे येत आहे. निव्वळ प्रशिक्षणाने चांगला शिक्षक बनण्याची खात्री नाही तरी ज्यावेळी हजारोच्या संख्येने शिक्षकांची आवश्यकता भासते त्यावेळी त्यांना चांगले प्रशिक्षण हाच एक उपाय आहे.

शिक्षकी पेशा हा एक स्वतंत्र व्यवसाय असून या व्यवसायाकरिता व्यक्तिशा तयार करण्यासाठी, घडवण्यासाठी त्यांच्यावर विशिष्ट संस्कार करण्याची कृती कार्यक्रम आखले जातात. या प्रक्रियेस सर्वसामान्य अर्थाने शिक्षक प्रशिक्षण असे संबोधले जाते. शैक्षणिक गुणवत्तेसाठी शिक्षक प्रशिक्षण हा एक महत्त्वपूर्ण घटक आहे. देशाच्या आर्थिक विकासाचा पाया शैक्षणिक प्रगतीवर अवलंबून असतो. ज्या देशात दर्जेदार प्राथमिक शिक्षण दिले जाते त्या देशात शेती, उद्योग, लोकसंख्या नियंत्रण, आरोग्य, दरडोई उत्पन्न इत्यादी क्षेत्रात प्रगती करण्यात यश प्राप्त होते. दर्जेदार प्राथमिक शिक्षणासाठी वेळोवेळी देशपातळीवर अनेक शिक्षण आयोग, समित्यांचे गठन करण्यात आले. यामध्ये मेकॉले आयोग वुढचा खलीता, हंटर आयोग, भारतीय शिक्षण आयोग, डॉ. झाकीर हुसेन समिती मुलउद्योगी शिक्षणाची वर्धा योजना, कोठारी आयोग, ईश्वर भाई पटेल समिती, शालेय

शिक्षण सुधार समिती, यशपाल समिती इत्यादी आयोग वा समित्या नेमल्या गेल्या या सर्व आयोग/ समित्यांनी आपले अहवाल सादर केले व त्यांच्या शिफारशीनुसार शैक्षणिक बदल करण्यात आले व अभ्यासक्रम पुनर्रचना करण्यात आली. त्यानुसार १९६८ चे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, १९८६ चे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, अभ्यासक्रम १९८८ , क्षमताधिष्ठित प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम १९९५, राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५ असे बदल झालेले आहेत. या सर्व प्रयत्नामुळे प्राथमिक शिक्षण सुधारणा होण्यासाठी मदत झालेली दिसून येते. मात्र गुणवत्तापूर्ण प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिककरण्याचे उद्दिष्ट अद्यापपर्यंत साध्य न झाल्याचे दिसून येते.

१९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात जनमानसाच्या प्रतिक्रियांचा विचार करून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ठरवले जाण्याची भारतीय शिक्षणाचा इतिहासातील ही पहिली वेळ होती. या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात जो निर्धार करण्यात आला त्यामध्ये प्राथमिक शिक्षणवरील गुंतवणूक म्हणजे सामाजिक क्षेत्रात केलेला खर्च नसून टिकाऊ स्वरूपाच्या दीर्घकालीन विकासासाठी केलेली अद्वितीय अशी गुंतवणूक आहे असे म्हटले आहे.

उपरोक्त सर्व बाबीचा विचार करता संशोधकांनी संशोधनासाठी जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था मार्फत राबविल्या जाणाऱ्या अविरत प्रशिक्षणाचा कार्यक्रमाची प्रशिक्षणार्थ्यांच्या गुणवत्तेवर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास हा विषय निवडला आहे.

जिल्ह्यातील शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी कार्य करणारी जिल्ह्याची शिखर संस्था म्हणून जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेकडे पाहिले जाते. जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था ही केंद्र पुरस्कृत योजना आहे. या संस्थांच्या स्थापनेचे नियोजन १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार झालेले आहे. भारतातील सर्व घटक राज्यामधील प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी ही संस्था स्थापन करण्यात यावी असे ठरविण्यात आले.त्याप्रमाणे प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेची स्थापना करण्यात आलेली आहे.

केंद्र शासनाने १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील मार्गदर्शक तत्त्वानुसार प्रत्येक जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेमध्ये ७ प्रमुख शाखा असाव्यात अशी शिफारस केली होती मात्र महाराष्ट्रातील जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेमध्ये ४ शाखा निर्माण करण्यात आल्या आहेत तसेच कर्मचारी संवर्ग नुसार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या एकूण ४८ पदांची रचना केंद्रशासनाने ठरवून दिलेली आहे. महाराष्ट्रात मात्र पदसंख्येतही कपात करून २६ पदास मान्यता दिली आहे.

संशोधक जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेत अधिव्याख्याता म्हणून कार्यरत आहे. संशोधकाचा सेवापूर्व सेवांतर्गत प्रशिक्षणाच्या निमित्ताने प्रशिक्षणार्थ्यांना नेहमी संपर्क होतो. सदर संस्थेमार्फत राबविल्या जाणाऱ्या प्रशिक्षण कार्यक्रमाचा प्रशिक्षणार्थींच्या गुणवत्तेवर नेमका काय

परिणाम होतो या जिज्ञासेपोटी संशोधकांनी या विषयाची निवड केली आहे.

१.२ संशोधनाची गरज

आजचे युग हे स्पर्धेचे व माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. आपला देश जागतिक महासत्ता होण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहे. यासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षणाची नितांत गरज निर्माण झाली आहे.

गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या हेतूने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ नुसार जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेची निर्मिती केली आहे.या संस्थांच्या स्थापनेनंतर शैक्षणिक प्रगतीत काय बदल घडून आला आहे यासंबंधी माहिती मिळणे गरजेचे वाटते. माध्यमिक शिक्षक व मुख्याध्यापक यांना सातत्यपूर्ण व्यावसायिक विकासासाठी दिल्या जाणाऱ्या अविरत प्रशिक्षणा ची अंमलबजावणी कशी होते. त्यामध्ये येणाऱ्या अडचणी कोणत्या अडचणी सोडविण्यासाठी काय प्रयत्न केले जातात तसेच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेमार्फत माध्यमिक शिक्षकांना प्रशिक्षण दिले जात आहे. या प्रशिक्षणाचा प्रशिक्षणात मिळालेल्या ज्ञानाचा वापर संबंधित शिक्षक दैनंदिन अध्यापनात करतात की नाही या प्रशिक्षणामुळे व मुख्याध्यापक व शिक्षकांच्या ज्ञानात भर पडते का त्यांच्या गुणवत्तेवर या प्रशिक्षण कार्यक्रमाचा काही परिणाम होतो का इत्यादी बाबत सविस्तर माहिती या संशोधनाच्या माध्यमातून मिळवता येऊ शकेल. शिक्षण प्रक्रियेमध्ये शिक्षक प्रशिक्षणाचा शैक्षणिक गुणवत्तेवर होणारा परिणाम अभ्यासण्यासाठी तसेच आणखी सुधारणा काय करता येतील हे सुचविण्यासाठी संशोधकाला या विषयाची गरज वाटली.

१.३ संशोधनाचे समस्या विधान

वाशिम जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील अविरत प्रशिक्षणाच्या परिणामकारकतेचा अभ्यास

१.४ समस्या विधानातील शब्दाच्या कार्यात्मक व्याख्या

१ वाशिम : महाराष्ट्र राज्यातील विदर्भातील एक जिल्हा .

२ माध्यमिक स्तर :१०+२+३ या आकृतिबंधातील इयत्ता नववी ते दहावीपर्यंतचे वर्ग असणारे शाळा.

३ मुख्याध्यापक : शाळेची नेतृत्व करणारी व्यक्ती .

४ शिक्षक : माध्यमिक स्तरावर अध्यापन करणारे शिक्षक .

५ अविरत प्रशिक्षण : माध्यमिक स्तरावरील मुख्याध्यापक व शिक्षकांना दिले जाणारे प्रशिक्षण.

६ परिणामकारकतेचा अभ्यास : माध्यमिक स्तरावरील मुख्याध्यापक व शिक्षकांना दिल्या जाणाऱ्या अविरत प्रशिक्षणाचा त्यांच्या व्यावसायिक गुणवत्तेवर झालेल्या परिणाम परिणामाचा अभ्यास.

१.५ संशोधन समस्येचे महत्त्व

असे म्हटले जाते की ज्या देशाची शिक्षण प्रक्रिया चांगली त्या देशाचा विकास चांगला आणि ज्या देशाचा शिक्षक चांगला त्या देशाची शिक्षण प्रक्रिया चांगली.

या शिक्षण प्रक्रियेतूनच उद्याचे भावी नागरिक तयार होणार आणि भावी नागरिकांची जडण घडण कशी होत आहे. अजून त्यांच्यात कोणते बदल होणे अपेक्षित आहे हा उद्देश समोर ठेवून शिक्षकांना अध्यापन करावे लागते.

१ गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी शिक्षक प्रशिक्षण आवश्यक आहे.

२ शिक्षक प्रशिक्षणासाठी कार्यरत संस्थेमार्फत दर्जेदार व गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण दिले जावे.

या वरील विधानास सदर संशोधनामुळे महत्त्व प्राप्त होईल.

१.६ गृहितके

१ जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था ही जिल्हास्तरीय प्रशिक्षण विषय प्रमुख संस्था आहे.

२ अविरत प्रशिक्षणाचा गुणवत्ता विकासावर अनुकूल परिणाम होतो.

३ समाज परिवर्तनासाठी शिक्षक प्रशिक्षण महत्व पूर्ण पर्याय आहे.

४ औपचारिक शिक्षण पद्धतीत शिक्षकांना सेवापूर्व व सेवांतर्गत प्रशिक्षण आवश्यक आहे.

५ प्रशिक्षित अध्यापकांचे अध्यापन परिणामकारक असते.

१.७ संशोधनाची उद्दिष्टे

१) वाशिम जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील मुख्याध्यापक व शिक्षक यांना दिल्या जाणाऱ्या अविरत प्रशिक्षणाचा आढावा घेणे.

२) माध्यमिक स्तरावरील शिक्षकांना दिल्या जाणाऱ्या अविरत प्रशिक्षणाचा त्यांच्या अध्यापन प्रक्रियेवर झालेल्या परिणामाचा अभ्यास करणे.

३) माध्यमिक स्तरावरील मुख्याध्यापकांना दिला जाणारा अविरत प्रशिक्षणाचा त्यांच्या शैक्षणिक नियोजन व व्यवस्थापन यावर झालेल्या परिणामाचा अभ्यास करणे.

४) माध्यमिक स्तरावरील मुख्याध्यापक व शिक्षकांना दिल्या जाणाऱ्या अविरत प्रशिक्षणाचा त्यांच्या व्यक्तिमत्व विकासावर झालेल्या परिणामाचा अभ्यास करणे.

५) माध्यमिक स्तरावरील शिक्षकांना दिल्या जाणाऱ्या अविरत प्रशिक्षणाची उपयोगिता वृद्धीसाठी उपाययोजना सुचविणे.

१.८ संशोधनाची परिकल्पना

१ जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेमार्फत दिल्याजाणाऱ्या अविरत प्रशिक्षणामुळे प्रशिक्षणार्थी

यांच्या व्यावसायिक गुणवत्तेत वाढ झालेली आहे .

२ अविरत प्रशिक्षणामुळे माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या अध्यापन प्रक्रियेमध्ये बदल झाला आहे.

३ अविरत प्रशिक्षणामुळे शैक्षणिक नियोजन व्यवस्थापन यामध्ये विकास झाला आहे.

४ अविरत प्रशिक्षणामुळे माध्यमिक स्तरावरील शिक्षक व मुख्याध्यापक यांच्या व्यक्तिमत्व विकास मध्ये वाढ झाली आहे.

१.९ संशोधनाची व्याप्ती

स्थलव्याप्ती : सदर संशोधन वाशिम जिल्ह्याची संबंधित असणार आहे.

कालव्याप्ती : सदर संशोधन हे ठराविक कालावधित पूर्ण केले जाईल, संशोधनासाठी 2017 ते 2020 या काळात झालेल्या प्रशिक्षणाचा समावेश असणार आहे.

आशयव्याप्ती : संबंधित संशोधन अविरत प्रशिक्षणार्थ्यांशी निगडीत असणार आहे.

१.१० मर्यादा

वाशिम जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील अविरत प्रशिक्षण घेतलेल्या मुख्याध्यापक व शिक्षक यांच्या पुरते मर्यादित असणार आहे.

स्थल मर्यादा: सदर संशोधन वाशिम जिल्ह्यातील अविरत प्रशिक्षण घेतलेले मुख्याध्यापकव शिक्षक त्यांच्यापुरते मर्यादित असणार आहे.

काल मर्यादा : सदर संशोधन हे संशोधनासाठी निवडलेल्या ठराविक कालावधी पुरते मर्यादित असणार आहे.

आशय मर्यादा: संबंधित संशोधन जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेद्वारे दिल्या गेलेल्या अविरत प्रशिक्षणार्थ्यांना पुरते मर्यादित असणार आहे.

१.११ संशोधनासाठी संशोधन पद्धतीची निवड

सदर संशोधनामध्ये जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था मार्फतराबविल्या जाणाऱ्या अविरत प्रशिक्षण कार्यक्रकांचा प्रशिक्षणार्थीच्या गुणवत्तेवर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास हा उद्देश आहे. हे पाहता सदर संशोधनासाठी संशोधकाने **वर्णनात्मक संशोधन पद्धतीची** निवड करणार आहे.

१.१२ संशोधनासाठी साधने व तंत्रची निवड

प्रस्तुत संशोधन समस्येचे स्वरूप, उद्दिष्टे ,व्याप्ती व मर्यादा लक्षात घेऊन संशोधकांने मुख्याध्यापक व शिक्षकांसाठी- प्रश्नावली व पदनिश्चयन श्रेणी या साधनाचा वापर करणार आहे.

या संशोधन साधनाची प्रस्तुत संशोधनासाठी निवड केली आहे. शिक्षकांना दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणातील त्यांना आवश्यक बाबी कोणत्या, प्रशिक्षणाची परिणामकारकता किती आहे, त्यामध्ये

कोणते बदल केले पाहिजे यांचा शोध घेण्याचा हेतू प्रश्नावली देण्यामागे संशोधकाचा होता.

१.१३ संशोधनासाठी नमुना निवड –

संशोधकाने संशोधनासाठी वरील सर्व प्रकारापैकी यादृच्छिक नमुना निवड पद्धतीमधील **लॉटरी नमुना निवड** पद्धतीची निवड करणार आहे . संशोधकाने वाशिम जिल्ह्याची निवड केली आहे. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था मार्फत राबविल्या जाणाऱ्या अविरत प्रशिक्षणाचा विचार प्रस्तुत संशोधनासाठी करणार आहे . प्रशिक्षण घेतलेले जिल्ह्यातील ४५० मुख्याध्यापक व शिक्षक यांची निवड करून प्रश्नावली व पदनिश्चयन श्रेणी भरून घेण्यात येणार आहे .

१.१४ संख्याशास्त्रीय तंत्रांची निवड

प्रस्तुत संशोधनामध्ये मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करण्यासाठी शेकडेवारी आलेख या संख्याशास्त्र तंत्राचा अवलंब केला जाणार आहे.

१.१५ संशोधनाची कार्यपद्धती

१. संशोधन आराखडा

२. संबंधित संशोधन साहित्याचा अभ्यास

३. संशोधन साधन निर्मिती

४. पथदर्शक अभ्यास

५. अंतिम साधन निर्मिती

६. संशोधन साधनांचे वितरण

७. माहितीचे संकलन व विश्लेषण

८. निष्कर्ष व अहवाल लेखन

१.१६ प्रकरण योजना

१. प्रकरण पहिले- संशोधन समस्येची ओळख

२. प्रकरण दुसरे- संबंधित साहित्य व संशोधनाचा आढावा

३. प्रकरण तिसरे- संशोधन पद्धती

४. प्रकरण चौथे -माहितीचे संकलन विश्लेषण व अर्थनिर्वचन

५. प्रकरण पाचवे - निष्कर्ष व शिफारशी

१.१७ संशोधन कालावधी.

अ. क्र.	कृती संशोधन कार्य	आवश्यक कालावधी
१	विषय निश्चिती व आराखडा निर्मिती	जून २०१९
२	संबंधित संशोधन साहित्याचा आढावा	जुलै ते डिसेंबर २०१९
३	संशोधन साधन निर्मिती व पूर्व चाचणी	जानेवारी२०२० ते एप्रिल २०२०
४	कार्यक्रम विकसन व अंमलबजावणी	मे२०२० ते डिसेंबर२०२०
५	संख्याकीय माहितीचे विश्लेषण	जानेवारी २०२१ ते मार्च २०२१
६	अहवाल लेखन व सादरीकरण	मे २०२१

१.२० संशोधन खर्च अंदाजपत्रक

अ. क्र.	खर्चाचा तपशील	अंदाजे रक्कम
१	प्रवास खर्च	१५०००
२	संदर्भ साहित्य	५०००
३	कार्यक्रम निर्मिती	१००००
४	अहवाल टंकलेखन व बायडिंग	१००००
	एकूण	४००००

संदर्भग्रंथ सूची

१ पारसनीस ,न. रा.(२००८) शिक्षकाचे प्रशिक्षण ,नूतन प्रकाशन पुणे .

२ मुळे ,रा. श. आणि उमाठे ,वि तु.(१९९८)शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे ,(तृतीय आवृती)विद्या प्रकाशन नागपूर .

३ भितांडे ,वि .रा.(२००७) शैक्षणिक संशोधन पध्दती .(प्रथम आवृती)नित्य नूतन प्रकाशन ,पुणे .

४ महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.नवनियुक्त प्रशिक्षित शिक्षकांसाठी हस्तपुस्तिका (मार्च २०१२),पुणे .

५ राज्य शिक्षण मंडळ हस्तपुस्तिका (२००२) महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.

६ आगलावे ,प्रदीप .(२०० ०) संशोधन पध्दती व तंत्रे विद्या प्रकाशन, नागपूर

७ कुंडले ,म बा .(२००३) शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशात्र ,(दहावी आवृती)श्री प्रकाशन ,पुणे .

८ पंडीत ,बन्सिबिहारी.(२००७)शिक्षणातील संशोषण. नित्य नूतन प्रकाशन ,पुणे .

९. बापट ,भा .गो .(१९८८) संशोधन पध्दती. ,(तृतीय आवृती) नित्य नूतन प्रकाशन ,पुणे .

१०. संपादक ,(१९९९)संशोधन मार्गदर्शक मालिका .नाशिक :यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त वियापीठ .
११. संपादक ,(१९९९) बालकाचा मोफत व सक्तीचा शिक्षण हक्क अधिनियम -२००९ . महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.
12. Best ,J.W.(1982)Research in Education ,Forth Edition .Delhi: Prentice Hall of Indian Private limited.
13. Buch ,M.B.(1991)Forth Survey of Research in Education .(Vol-I.1983-88).New Delhi:NCERT.
14. Buch ,M.B.(Editor).(2000) Fifth Survey of Research in Education (Vol-II.1988-92) New Delhi:NCERT.
15. Buch ,M.B.(Editor).(21979) Secound Survey of Research in Education (1972 -1978).Baroda :Society for Educational Research and Development.
16. www.education.nic.in
17. www.mpsp.pune.org
18. www.mscert.org
19. www.india.gov.in
20. www.josrjournals.org

संशोधक
शिवशंकर वामनराव मोरे
एम .ए .एम .एड्.सेट,नेट(शिक्षणशास) नेट (इतिहास)
अधिव्याख्याता
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था ,
वाशिम

मार्गदर्शक
डॉ.मधुकर अबाजी पुंडगे
एम .ए . एम एड् पी.एच.डी.(शिक्षणशास्त्र)
प्राचार्य
संत गाडगे महाराज अध्यापक महाविद्यालय,
हिंगोली